महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०५ वा | दिनांक : १९/०१/२०२५ | वार : रविवार

# पालकमंत्र्यांची यादी जाहीर



**मुंबई :** आत्ताच्या क्षणाची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेली पालकमंत्र्यांची यादी अखेर जाहीर झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असणार आहे. तसेच, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असणार आहेत. तर, अजित पवार यांच्याकडे बीड जिल्ह्यासोबतच पुण्याचीही जबाबदारी देण्यात आली आहे. तर धनंजय मुंडे यांचं नाव पालकमंक्त्र्यांच्या यादीतून वगळण्यात आलेलं आहे.

मस्साजोग सरपंच हत्याप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडल्याने मंत्री धनंजय मुंडे यांना पालकमंत्र्यांच्या यादीतून वगळल्याचे दिसून येत आहे. तर मुंडे यांच्याकडे बीडचे पालकमंत्रीपद देऊ नये, अशी मागणी जनतेकडून केली जात होती. त्यामुळेच बीडचे पालकमंत्रीपद हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देण्यात आले आहे.

गडचिरोली - श्री. देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस, मा. मुख्यमंत्री, ठाणे - श्री. एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, मा. उप मुख्यमंत्री, मुंबई शहर - श्री. एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, मा. उप मुख्यमंत्री, पुणे - श्री. अजित आशाताई अनंतराव पवार, मा. उप मुख्यमंत्री, बीड - श्री. अजित आशाताई अनंतराव पवार, मा. उप मुख्यमंत्री, नागपूर - श्री. चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे, अमरावती - श्री. चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे, अहिल्यानगर - श्री. राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे-पाटील, वाशिम - श्री. हसन सकिना मियालाल मुश्रीफ, सांगली - श्री. चंद्रकात (दादा) सरस्वती बच्चू पाटील, नाशिक - श्री. गिरीश गीता दत्तात्रय महाजन, पालघर - श्री. गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक, जळगाव यवतमाळ - श्री. गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील, श्री. संजय प्रमिला दुलिचंद राठोड, मुंबई उपनगर - ॲड. आशिष मिनल बाबाजी शेलार, श्री. मंगल प्रभात प्रेमकवर गुमनमल लोढा (सह-पालकमंत्री), रत्नागिरी - श्री. उदय स्वरुपा रविद्र सामंत, धुळे - श्री. जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, जालना - श्रीमती पकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे, नांदेड - श्री. अतुल लिलावती मोरेश्वर सावे, चंद्रपूर - डॉ. अशोक जनाबाई रामाजी उईके, सातारा - श्री. शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई, रायगड - कु. आदिती वरदा सुनिल तटकरे, लातूर - श्री. शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभय सिंहराजे भोसले, नंदूरबार - ॲड. माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे, सोलापूर - श्री. जयकुमार कमल भगवानराव गोरे, हिंगोली - श्री. नरहरी सावित्रीबाई सीताराम झिरवाळ, भंडारा - श्री. संजय सुशीला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर - श्री. संजय शंकुतला पाडुरंग शिरसाट, धाराशिव - श्री. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, बुलढाणा - श्री. मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील), सिंधुदुर्ग - श्री. नितेश निलम नारायण राणे, अकोला - श्री. आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर, गोंदिया - श्री. बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील, कोल्हापूर - श्री. प्रकाश सुशीला आनंदराव आबिटकर, श्रीमती माधुरी मीरा सतिश मिसाळ (सह-पालकमंत्री), गडचिरोली - ॲड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल (सह-पालकमंत्री), वर्धा - डॉ. पंकज कांचन राजेश भोयर, परभणी - श्रीमती मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर

# आम्हाला कुणबी आरक्षण नको, नारायण राणे यांचा पुनरुच्चार

**रत्नागिरी :** माजी केंद्रीय मंत्री तथा भाजप खासदार नारायण यांनी शनिवारी पुन्हा एकदा मराठा समाजाला कुणबी आरक्षण नको असल्याचा पुनरुच्चार करत मराठा आरक्षणासाठी रान पेटवणाऱ्या मनोज जरांगे पाटलांवर शरसंधान साधले आहे. आम्हाला कुणबी मराठा आरक्षण नको आहे. कारण, मराठा समाजाील कोणताही व्यक्ती स्वतःला कुणबी म्हणवून घेत नाही, असे ते म्हणालेत.

नारायण राणे यांनी शनिवारी रत्नागिरी येथील अखिल भारतीय मराठा फेडरेशनच्या अधिवेशनाला हजेरी लावली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मराठा समाजाला कुणबी जातीचे आरक्षण नको असल्याचे ठणकावून सांगितले. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणासाठी संपूर्ण महाराष्ट्रात रान पेटवणाऱ्या मनोज जरांगे पाटलांचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख त्यांच्याकडेच होता हे स्पष्ट आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून कुणबी आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी राज्य सरकारला २५ जानेवारीपर्यंतची मुदत दिली आहे. या मागणीसाठी त्यांनी २५ जानेवारीपासून जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे उपोषण करण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर नारायण राणे यांनी हे मत व्यक्त केले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे नारायण राणे यांनी यापूर्वीच मराठा समाजाला ओबीसी समाजाच्या वाट्याचे आरक्षण नको असल्याचे स्पष्ट केले आहे. मराठा समाजातील अनेकजण गरीब आहेत. त्यामुळे या समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे. पण ओबीसी समाजाच्या वाट्याचे आरक्षण काढून ते मराठ्यांना देऊ नये या मताचा मी आहे. कोणत्याही राजकीय नेत्याने मराठा व ओबीसी अशी झुंज लावण्याचा प्रयत्न करू नये. माझ्या काळात मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्यात आले होते. पण ते ओबीसींचे काढून दिले नव्हते, असे ते म्हणाले होते.

# शक्तिपीठ महामार्गाला माझाही विरोध - अशोक चव्हाण



**नांदेड :** शक्तिपीठ महामार्गाला माझाही विरोध, अशी प्रतिक्रिया भाजप नेते व खासदार अशोक चव्हाण यांनी दिली आहे. शक्तिपीठ महामार्गाला जमिनी देण्यास नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. त्यावर जे शेतकऱ्यांचे मत आहे, तेच माझे मत असल्याचे अशोक चव्हाण म्हणाले आहेत.

अशोक चव्हाण म्हणाले, जे शेतकऱ्यांचे मत आहे तेच माझे मत आहे. दरम्यान यात काही पर्याय उपलब्ध आहेत का, हे पहावे लागेल. यातून काही मार्ग काढता येईल का ते बघू. याबाबत मी शेतकऱ्यांना भेटणार आहे, त्यानंतर मी या संदर्भात मुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याची माहिती अशोक चव्हाण यांनी दिली आहे.

कोल्हापूर - अंबाबाई, तुळजापूर - तुळजाभवानी. नांदेड - माहूरची रेणुका देवी या तीन शक्ती पीठांना जोडणारा हा महामार्ग असणार आहे. परळी वैजनाथ, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ (नागेश्वर), माहूरची रेणुकादेवी, तुळजापूरची तुळजाभवानी, पंढरपुरचे विठ्ठल रखुमाई मंदिर, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, सोलापूरातील सिद्धरामेश्वर, अक्कलकोट, गाणगापूर, कारंजा (लाड), नृसिंहवाडी, औदुंबर या बारा देवस्थानांना हा महामार्ग जोडणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ जानेवारी २०२५


## विविध उपक्रमांनी अशोकदादा गरुड यांचा वाढदिवस साजरा




**कन्नड (अरुण थोरात) :** सिल्लोड पंचायत समितीचे माजी सभापती तथा भाजपा तालुकाध्यक्ष, अशोक गरूड यांचा वाढदिवस दि. १७ जानेवारी रोजी रक्तदान शिबिर,संस्था समूह अंतर्गत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, आनंद नगरी, डॉ. विष्णू सुरासे यांचे व्याख्यान आदी कार्यक्रमाने पार पडला. यात हास्य कवी डॉ. सुरासे यांनी आपल्या हास्य विनोदातून उपस्थितांची मने जिंकली.

यांनतर सांस्कृतिक कार्यक्रमातून अंधश्रद्धा, हुंडा बंदी, व्यसनमुक्ती यावर नाटिका व हिंदी मराठी गीतांवर विद्यार्थ्यांनी आपली नृत्य कला सादर केली. यावेळी माजी आमदार सांडू पा.लोखंडे, दिलीप दानेकर, नगरसेवक मनोज मोरेलू, सुनील मिरकर, इद्रिस मुलतानी, ज्ञानेश्वर मोठे,सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी आर. डी, तांगडे, उपशिक्षणाधिकारी भारत पालवे, प्रा. श्याम सरकटे, पुंजाराम गरुड, आत्माराम आमटे, गणेश बनकर, राजेंद्र ठोंबरे, विक्रांत दौड, सचिन चौधरी, अनिल खरात, प्रदीप शेजुळ, राजेंद्र शेजुळ, अरुण राठोड, विशाल मुरकुटे, गौरव देशमुख, खेळवणे, वानखेडे, धनंजय गव्हाले ,गणेश टाकसाळे, अंबादास गावंडे, गणेश वाघ, ज्ञानेश्वर कळात्रे, अशोक टेहरके, रंगनाथ लघाने, श्रीमती तुपे, रामचंद्र मोरे, ओम गाढे, भाऊसाहेब आव्हाळे, किसनराव नवले, गणेश काळे, बबनराव देशमुख, अमोल शेळके, प्रवीण मिरकर, राजेंद्र ठोंबरे, प्रशांत क्षीरसागर, काशिनाथ शेजुळ, प्रभाकर दहीहांडे, अरुण राठोड, राघव जाधव, पैठणे, गोरे, श्री दापके , पोपट कुंटे, श्री लक्षबंधे, संजय डमाळे,संतोष काकडे, विष्णू कोल्हे, अनंत जोशी, संतोष जाधव,जैस्वाल, गणेश राव, कैलास मोरे, मधुकर काळे, विकास काळे, प्रशांत शेळके, अतुल प्रसाद सचिन चोबे, मकरंद कोरडे, निलेश सोनटक्के, भिवसने, मानकर, किरण जाधव, देविदास नेव्हारे, ज्ञानेश्वर नेवारे, दामोधर मोरे, दांगोडे, पडोळ, चाफे, समाधान सोनवणे, योगेश सोनवणे, गौतम कोनोने, महेश मते, श्लोक देशपांडे, ज्ञानेश्वर नेव्हारे, रवींद्र काकडे, मयूर अग्रवाल, सुलताने, शिल्पा देशपांडे, रामराव सुलताने, दत्ता लाकडे, ज्ञानेश्वर सावळे, कदम, शिवाजी डापके, शंकर नलावडे, प्रदीप निकम, शिवराज खोमणे, यमाजी निकम, साहेबराव पारखे, विजेंद्र देशमुख, इरफान देशमुख, चांद मिस्तरी, शिवाजीराव देशमुख, देविदास गरुड, आचार्यजी, घुगे, लांडगे, धनवत, चौधरी, अप्पा पा. ठोंबरे, संतोष ठोंबरे, कैलास भागवत, डॉ. मनजीत गोंगे,सागर राजपूत,विश्वंभर काथार, कैलास गरुड, प्रभाकर वाघ, यासह, सरस्वती विद्यालय तळणी, इंद्रगढी प्रा.शाळा घाटनांद्रा, यशदा प्रा.शाळा हर्सूल, ज्ञानविकास विद्यालय भराडी, एकता उर्दू शाळा घाटनांद्रा, प्रज्ञा जागृती प्रा.शाळा आमठाना सर्व मुख्यद्यापक, सहशिक्षक वृंद, ग्रामस्थ, पालक आदी उपस्थित होते.आलेल्या मान्यवरांचा सत्कार, अशोकदादा गरुड, शिल्पाताई गरुड, आदित्य गरुड, प्राध्यापक सतीश देशमुख, कुशल देशमुख, राम गरुड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधाकर जाधव, सूत्रसंचालन प्रा. राजगुरू, जनार्दन कुंटे तर आभार प्रमोद जंगले यांनी मानले

## शांतिनिकेतन शाळेत होम मिनिस्टर कार्यक्रम उत्साहात साजरा



**शांतीनिकेतन विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित होम मिनिस्टर सोहळ्याप्रसंगी बोलताना आकांक्षा चौगुले, दुर्गाप्रसाद मोटे, शरणप्पा मुदकन्ना, प्रभावती कोराळी, प्रतिभा मुदकन्ना, सुषमा मुदकन्ना, तेजस्विनी मुदकन्ना.**

**मुरुम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील शांतीनिकेतन शाळेच्या वतीने आयोजित हळदी कुंकू व होम मिनिस्टर कार्यक्रम शुक्रवारी (ता. 17) रोजी शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी ज्ञानज्योती सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा आकांक्षा चौगुले यांच्या प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. महिलांनी एकमेकींना हळद-कुंकू लावून सौभाग्याचे प्रतीक म्हणून ओटी भरली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शरणप्पा मुदकन्ना होते.

याप्रसंगी प्रभावती कोराळी, प्रतिभा मुदकन्ना, सुषमा मुदकन्ना, तेजस्विनी मुदकन्ना, संध्या शिंदे, दुर्गाप्रसाद मोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तेजस्विनी मुदकन्ना म्हणाल्या की, माता भगिनी सतत कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्यात व्यस्त असतात. घरगुती कामे, नोकरी कुटुंबातील जबाबदाऱ्या मोठे जिकरीने पार पाडतात. घर आणि सततच्या व्यापातून स्वतःसाठी थोडासा मोकळा वेळ व आनंद घेता यावा, म्हणून शांतिनिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांच्या महिला-पालकांसाठी हा आनंद उत्सव आयोजित करण्यात येत असतो. प्रमुख अतिथी म्हणून आकांक्षा चौगुले म्हणाल्या की, पहाटे उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत प्रचंड काबाडकष्ट करणाऱ्या व कुटुंबाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पडणाऱ्या महिलांच्या स्वतःच्या आनंदासाठी अत्यंत सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उपस्थित महिलांनी यात सहभागी होऊन संपूर्ण कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घ्यावा. स्वतःसाठी अशा कार्यक्रमाकरिता वेळ काढून आनंद घेत राहावे, असे त्यांनी शेवटी सांगितले. दुर्गाप्रसाद मोटे पुरस्कृत होम मिनिस्टर कार्यक्रम ज्यामध्ये महिलांसाठी विविध खेळ, प्रश्नमंजूषा, गाणी, नृत्य आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विजेत्यांना पाच बक्षिसे देण्यात आली. होम मिनिस्टर स्पर्धेच्या विजेत्या ठरलेल्या भाग्यश्री माने यांना आकर्षक पैठणी, उपविजेत्या प्रियंका सुतके यांना सोन्याची नथ, तृतीय पारितोषक पटकाविणाऱ्या अंबिका लोणी यांना डिनर सेट तर उत्तेजनार्थ शिल्पा स्वामी यांना ज्यूस सेट तर ज्योती भोसले यांना कफ सेट मान्यवरांच्या हस्ते भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बहुसंख्येने महिलांनी एकजूट व उत्साहाने सहभाग नोंदवला. या कार्यक्रमासाठी मनोज बोंदर, नलिनी जाधव, स्वाती महामुनी, सुनिता स्वामी, माधवी कलशेट्टी, सारिका शेळके, प्रिया वेदपाठक, मनीषा निंबरगे, रूपाली शिंदे, ऐश्वर्या मुदकन्ना, काजल कांबळे, प्रज्ञा कांबळे, मेघा भोसले, प्रभावती गिरीबा, सुमित्रा हंचाटे, शंकर अंबुसे आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अब्दुलगणी बागवान यांनी केले. स्वाती महामुनी यांनी सूत्रसंचालन तर सारिका शेळके यांनी आभार मानले. या सोहळ्यासाठी महिलांची मोठी उपस्थिती होती


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार 19 जानेवारी 2025


## तरुणांनी गावच्या विकासात स्वतःला झोकून द्यावे - मदन पाटील



**नाईक नगर, ता. उमरगा येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबीराप्रसंगी मदन पाटील बोलताना बापूराव पाटील, माणिक राठोड, गोविंद पाटील, व्यंकटराव जाधव, योगेश राठोड, अशोक सपाटे व अन्य.**

**मुरुम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : देशाला अधिक समृद्ध करण्यासाठी ग्रामसफाई, पाण्याची बचत, पर्यावरणाचे संवर्धन, निती मूल्याचे शिक्षण, जातीय सलोखा, आरोग्य संवर्धन या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. ही विशेष शिबिरे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक नव्हे, तर मानसिक, सामाजिक, भावनिक विकास करून तरुणांना चांगले नागरिक बनण्याच्या दृष्टीने प्रभावी ठरतात. राष्ट्र अभिमान जोपासण्यासाठी तरुणांनी गावच्या विकासात स्वतःला झुकून द्यावे, असे प्रतिपादन उमरगा पंचायत समितीचे माजी सभापती मदन पाटील यांनी केले. नाईक नगर, ता. उमरगा येथे श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष वार्षिक शिबिराप्रसंगी शनिवारी (ता. १८) रोजी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माणिकराव राठोड होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील होते. यावेळी नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, उमरगा पंचायत समितीचे माजी सभापती मदन पाटील, माजी उपसभापती गोविंद पाटील, माजी नगराध्यक्ष रशिद शेख, योगेश राठोड, डॉ. सतिश शेळके, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य रमेश जाधव, उपमुख्याध्यापक उल्हास घुरेघुरे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार आदिंची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बापूराव पाटील यांच्या हस्ते शिबिराचे भूमिपूजन झाडाला आळे व पाणी घालून उद्घाटन करण्यात आले.

पुढे बोलताना मदन पाटील म्हणाले की, सध्या तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. या आव्हानावर मात करण्याकरिता या परिसरातील तरुणांनी आरोग्याची काळजी घेणे, वाढती व्यसनाधीनता आणि मोबाईलचा अतिरेकी वापर टाळणे गरजेचे आहे. युवकांनी तंत्रज्ञानाच्या काळात डिजिटल साक्षर बनणे गरजेचे असल्याचे शेवटी ते म्हणाले. डॉ. सतिश शेळके, योगेश राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रतापसिंग राजपूत, डॉ. शिला स्वामी, डॉ. रविंद्र आळंगे, डॉ. प्रकाश कुलकर्णी, डॉ. विलास खडके, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. संध्या डांगे, विद्यार्थी प्रतिनिधी धीरज मुदकन्ना, विद्यार्थिनी प्रतिनिधी मनिषा पुराणे आदिंनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक सपाटे यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी, ग्रामस्थ उपस्थित होते.






## महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालयाचे वार्षिक स्नेह संमेलन संपन्न




**कन्नड (अरुण थोरात):** "श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय संस्था, छत्रपती संभाजीनगर संचलित कै. झेलुबाई शंकरराव पाटील गायकवाड प्राथमिक विद्यालय, महाराजा सयाजीराव गायकवाड माध्यमिक विद्यालय आणि सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज, कन्नड यांच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेह संमेलनात विद्यार्थ्यांनी गीत, नाटिका सादर केले यात प्रामुख्याने श्री गणरायाच्या गीताने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले गाण्यांत लावणी, भारूड , दिंडी, आदिवासी गीते, असे बहारदार गाणी सादर केली.

कार्यक्रमाचे प्रमुख उदघाटक आमदार संजनाताई जाधव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व संस्थेच्या प्रगती बद्दल प्रशंसा केली. उपस्थितीत भाजपा जिल्हाअध्यक्ष संजय खंबायते, मा. नगराध्यक्ष संतोष कोल्हे मा. शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब तुपे, रामजी गोंडे, मा. सदस्य विभागीय शिक्षण मंडळ, सुभाष मानकर मा. उपाध्यक्ष जिल्हा परिषद, श्री थोले, श्री मगर, कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड चे उपसभापती जयेश बोरसे नगरसेवक काकासाहेब कवडे, युवराज बनकर प्राचार्य संतोष मतसागर विनायकराव पाटील कॉलेज, सतीश शर्मा, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ संजय गव्हाणे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष काळे, प्रशांत अग्रवाल, कैलास जाधव, प्रदीप बोडखे संस्थेचे अध्यक्ष गणपतराव गायकवाड, सचिव उदयसिंह गायकवाड, संस्थेचे कोषाध्यक्ष अभयसिंह गायकवाड माध्यमिक शाळेचे मु.अ उद्धव पवारप्राथमिक शाळेचे मु.अ प्रमोद गायकवाड यांनी प्रस्थाविक केले. उज्वला आल्हाड व योगिता निकम यांनी सूत्रसंचालन केले व विलास इंगळे यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीते-साठी सुनील गायकवाड, राजू सपकाळ, दीपक कुमावत, बाळू डगळे, मनोज कुंटे, तातेराव गोरे, गणेश कोकणी, विनोद भुसारे, मेघा जाधव, अनुपमा मोरे, प्रियंका बोरसे, दीपाली सोनवणे, रेखा चव्हाण, मीनाक्षी भामरे, सचिन बोडखे, यांनी मेहनत घेतली.

## वाल्मीक कराडच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर ३५ एकर शेती

**बीड :** बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी तसेच मंत्री धनंजय देशमुख यांच्या जवळचा असणारा वाल्मीक कराडवर आता मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून पुढील चौकशी व कारवाई सुरू आहे. वाल्मीक कराडची अनेक ठिकाणी मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. बीड, परळी, पुणे, पिंपरी चिचवडनंतर आता सोलापूरमध्ये सुद्धा कराडची मालमत्ता असल्याची माहिती समोर आली आहे.

वाल्मीक कराडच्या पहिल्या पत्नीच्या नावावर पुण्यात अनेक ठिकाणी मालमत्ता आहे, तसेच त्याची दुसरी पत्नी ज्योती जाधव हिच्या नावावर सोलापूर येथील बार्शी येथे जवळपास ३५ एकर शेती असल्याची माहिती मिळाली आहे. विशेष म्हणजे या शेतात काम करणाऱ्या सालगड्याला गेल्या तीन महिन्यांपासून पगारच दिला नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे समोर आले आहे.

लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथील शिंदे माने या कुटुंबाने गेल्या तीन महिन्यांपासून मजुरी न मिळाल्याची खंत व्यक्त केली आहे. बार्शी तालुक्यातील शेंद्री गावात वाल्मीकच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर ३५ एकर जमीन आहे. याठिकाणी गेल्या ७ महिन्यांपासून माणिक शिंदे-माने यांचे कुटुंब सालगडी म्हणून काम पाहत आहे. मात्र गेल्या ३ महिन्यांपासून त्यांना पगारच दिला गेला नसल्याची माहिती सालगड्याने दिली आहे. पगार मिळत नसल्याने या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या संजली दमानिया यांनी बार्शी तालुक्यातील शेंद्री गावात वाल्मीक कराडच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर ३६ एकर जमीन असल्याचे ट्विट केले होते. याची अंदाजे किंमत हीह सुमारे दीड कोटी रुपये इतकी आहे. दोन वर्षांच्या कालावधीत ही जमीन खरेदी करण्यात आली असल्याची माहिती देखील अंजली दमानिया यांनी दिली होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार 19 जानेवारी 2025



**विद्यार्थी नेते राजेश लहरे, (वस्ताद) यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराच्या वतीने प्रा. डॉ. दिगंबर गंगावणे, भारतीय विद्यार्थी सेनेचे विद्यापीठ प्रमुख डॉ. तुकाराम सराफ, सिनियर रिसर्च फेलो डॉ. किशोर सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. हसन इनामदार, विद्यार्थी नेते डॉ. नामदेव कचरे मोनुज हॉटेल चे संचालक मुजीब खान दिसत आहेत**

# जन आक्रोश मोर्चास भारतीय दलित पँथरचा जाहिर पाठिंबा

**छत्रपती संभाजीनगर** : बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या झालेल्या क्रूर हत्येच्या निषेधार्थ रविवार, दि. १९ जानेवारी रोजी सकल मराठा समाज आयोजित सर्वधर्मीय, सर्वपक्षीय जन आक्रोश मोर्चास भारतीय दलित पँथरने पाठिंबा जाहिर केला असून भारतीय दलित पँथर नेते ॲड. रमेशभाई खंडागळे मोर्चास उपस्थित राहणार आहेत. भारतीय दलित पँथरचे सर्व जिल्हा पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी होणा आहे. जोपर्यंत संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत भारतीय दलित पँथर हे आंदोलन सुरुच ठेवणार असून सोमनाथ सूर्यवंशी आणि विजय वाकोडे शहीद झाले असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पँथर राज्यभर आंदोलन करणार असल्याचे ॲड. रमेशभाई खंडागळे यांनी सांगीतले आहे.

रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता क्रांतीचौक ते विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगरपर्यंत काढण्यात येणाऱ्या जन आक्रोश मोर्चात पँथर भीमसैनिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन भारतीय दलित पँथरचे युवा प्रदेशाध्यक्ष रतनभाई खंडागळे, संतोष खिल्लारे, नितेश तांगडे, गणेश चव्हाण, कडुबा म्हस्के, अजय बोर्ड, संतोष खरात, आनिल हतागळे, शोभाताई पद्मणे, उषा खंडाळे, सुभद्रा नवगीरे सिद्धार्थ नरवडे, ॲड. दिलीप नवगिरे, देविदास वाघमारे, काकासाहेब सिरसाठ, शरद नरवाडे आदींनी केले आहे.

## २३-२४ जानेवारीला बालकुमार साहित्य संमेलन

**पुणे** : अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे यांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त चाळकवाडी-पिंपळवंडी, नारायणगाव येथे दोन दिवसीय बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध बालसाहित्यिक ग. ह. पाटील यांच्या जन्मगावी होणाऱ्या या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ बालसाहित्यिक सूर्यकांत सराफ यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.

२३ जानेवारीला दुपारी ३ वाजता आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन होणार आहे. संमेलन नगरीला 'ग. ह. पाटील बालसाहित्य नगरी' असे नाव देण्यात आले असून, मुलांमध्ये वाचनाची आवड वाढावी आणि त्यांना नामवंत बालसाहित्यिकांशी संवाद साधता यावा या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे.

२४ जानेवारीला सकाळी ९ वाजता खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. यानंतर 'बालसाहित्याची सद्य:स्थिती' या विषयावर परिसंवाद, 'मनोरंजनातून बालसाहित्य' या विषयावर विशेष सत्र आणि शालेय विद्यार्थ्यांचे कविसंमेलन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीकांत पाटील, अनिल कुलकर्णी, जालिंदर डोंगरे, एकनाथ आव्हाड यांसारखे नामवंत साहित्यिक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या पुरस्कृत या संमेलनात स्थानिक लोकप्रतिनिधी, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

चौथ्या सत्रात दुपारी २:३० वाजता 'कथा पंचक' अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांचे कथावाचन होणार असून बालसाहित्यिक डॉ. विनोद सिनकर (छत्रपती संभाजीनगर) अध्यक्षस्थानी असणार आहेत. दुपारी ३:३० वाजता आयोजित पाचव्या सत्रात संजय ऐलवाड (पुणे), बालकृष्ण बाचल (पुणे) आणि उत्तम सदाकाळ (जुन्नर) 'कथाकथन' सादर करणार असून रमेश तांबे (मुंबई) अध्यक्षस्थानी असणार आहेत. सायंकाळी ४:३० वाजता प्रसिद्ध बालसाहित्य समीक्षक डॉ. विद्या सुर्वे-बोरसे (नाशिक) यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलनाचा समारोप होणार आहे.

# महिलांनी शिक्षण घेऊन नोकरी- व्यवसाय करून स्वावलंबी बनावे - प्रा. वासनिक




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** महिलांनी शिक्षण घेऊन, नोकरी व्यवसाय करून, स्वावलंबी बनून म्हणून स्वयंविकास करावा, असे प्रतिपादन जालनाच्या जेईएस महाविद्यालयाच तर्फे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात मौजे-सायगाव (डोंगरगाव ) येथे आयोजित महिला मेळाव्यात प्रा. करुणा वासनिक यांनी केले.जेईएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मौजे-सायगाव(डोंगरगाव) ता.बदनापुर जि.जालना सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर डिजिटल साक्षरता या विषयावर आयोजित करण्यात आले असून येथे दि.१७ शुक्रवार रोजी दुपारच्या सत्रात महिला मेळाव्यात महिला सक्षमीकरण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी प्रमुख व्याख्यात्या समाज शास्त्रज्ञ प्रा.करुणा वासनिक, तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा.भाग्यश्री बियाणी होत्या. व्यासपीठावर आदर्श विद्यालयाच्या शिक्षिका श्रीमती अहिरराव, व श्रीमती हिवरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बोलताना प्रा. करुणा वासनिक म्हणाल्या की महिलांनी आपल्या सक्षमीकरणाकरता शिक्षण घेतले पाहिजे, शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर व्यवसाय लवकर या केल्या पाहिजेत तरच महिला स्वावलंबी होतील देशांमध्ये आर्थिक व सामाजिक समता निर्माण करण्यासाठी महिलांनाही शिक्षणाची आवश्यकता आहे शिक्षण हे मानवी जीवनातील अमूल्यग्राहय परिवर्तनाचे साधन आहे शिक्षणाशिवाय महिलांची प्रगती होऊ शकत नाही असेही प्रा.वासनीक म्हणाल्यात.यावेळी डोंगरगाव सोयगाव येथील महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ राजेंद्र सोनवणे, प्रा डॉ राजेश सरकटे, प्रा. योगेश लहामाटे, प्रा. किशोर तापडिया, तसेच शिबिरार्थी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. महिला मेळाव्याचे सूत्रसंचालन कु. संस्कृती संगम तर आभार प्रदर्शन कु. दर्शना दैठणकर यांनी केले.

# जनआक्रोश मोर्चास रिपब्लिकन सेनेचा पाठिंबा सरसेनानी आनंदराज आंबेडकर मोर्चात सहभागी होणार

**छत्रपती संभाजीनगर** : बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या झालेल्या क्रूर हत्येच्या निषेधार्थ रविवार, दि. १९ जानेवारी रोजी सकलसर्वधर्मीय, सर्वपक्षीय जन आक्रोश मोर्चास रिपब्लिकन सेनेने पाठिंबा जाहीर केला असून रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी मा. आनंदराज आंबेडकर साहेब हे स्वत: या मोर्चास उपस्थित राहणार आहेत. शिवाय मराठवाड्यातील रिपब्लिकन सेनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

दि.१३ जानेवारी रोजी स्वत: आनंदराज आंबेडकर यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सांत्वन केले व जोपर्यंत देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असा शब्द दिला होता शिवाय सोमनाथ सूर्यवंशी हे संविधानाच्या रक्षणार्थ शहीद झाले असून त्यांना न्याय मिळवून देणारच अशी भूमिका आनंदराज आंबेडकर यांनी जाहीर केली आहे.

रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता क्रांतीचौक ते विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगरपर्यंत काढण्यात येणाऱ्या जन आक्रोश मोर्चात समस्त आंबेडकरी पक्ष-संघटना, संस्था तसेच भीमसैनिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य सुनील वाकेकर, डॉ. सुशील सूर्यवंशी, चंद्रकांत रुपेकर, सचिन निकम, मिलिंद बनसोडे, प्रा. सिद्धोधन मोरे, काकासाहेब गायकवाड, अस्कर खान, विकास हिवराळे, रामराव नरवडे आदींनी केले आहे.